INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# "गोंदेश्वर मंदिर स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ नमुना : एक अभ्यास"

## (Godeshwar Temple, a masterpiece of architectural art: A study)

**प्रा.डॉ. आर.ए. चव्हाण**
(इतिहास विभाग)
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड.
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2025-98655287/IRJHIS2403036

**प्रस्तावना :**

गतकाळाच्या मूळ स्मृती हरवून अनेक वारसास्थळे माणसांनी दिलेली नवीन रूपे धारण करताना दिसतात. त्याला देवता आणि मंदिर आपवाद नाही. महाराष्ट्राच्या प्रदीर्घ इतिहासात राजकीय व धार्मिक स्थित्यंतरांच्या काही खुणा आज मंदिरातील अवशेषांच्या माध्यमातून जिवंत आहेत. पौराणिक मंदिर पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते की, मंदिर स्थापत्य कलेचे, संस्कृतीचे आणि सामाजिक जीवनाचे एक उर्जापीठ आहे. एखाद्या वास्तूवर प्रेम आणि भक्ती का करावी या प्रश्नाचे उत्तर म्हणजे मंदिर व त्याचे वास्तुशास्त्र महाराष्ट्राच्या कलासंपन्नतेचे दर्शन घडते ते अजिंठा-वेरूळ येथील अप्रतीम लेणींच्याद्वारे त्याच्या संस्कृतीचे, तत्वज्ञानाचे दर्शन घडते येथील भव्य मंदिरातून आणि देव-देवतांच्या देखण्या व भावपूर्ण मूर्तीतून येथे सत्यम शिवम् सुंदरम भक्तीरसात न्हाऊन निघणाऱ्या शिवाच्या उपासकासाठी आहे असे लक्षात येते.

मंदिर आणि आपले नाते हे श्रध्दा आणि भावनेचे असते. रोजच्या धकाधकीच्या, धावपळींच्या जीवनशैलीतून काही क्षण बाजुला सारून आपण मंदिरात नतमस्तक होत असतो. ही आपली परंपरा आहे. मंदिरात आल्यापासून बाहेर पडेपर्यंचा कालावधी हा थोडाच असतो. म्हणूनच एकदा का दर्शन घेतले की, आपण दिवसभरात मंदिराचे भौगोलिक स्थानही विसरून जातो. अनेकदा मंदिराच्या रचनेपेक्षा आपल्याला आपले आणि मूर्तीचे नाते हे जास्त जवळचे वाटते. आपल्या आजूबाजूला असणारी मंदिरे ही क्वचितच पौराणिक असतात. बहुतांशी ती नव्यानेच बांधली गेलेली असतात. त्यामुळे या मंदिरात उत्कृष्ट स्थापत्यशास्त्रापेक्षाही गाभाऱ्यातील मूर्तीचे स्थान जास्त अधोरेखित केलेल असते. शेकडो वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी अनेक मंदिरं बांधली. नुसतीच बांधली नाहीत, मंदिरांनाही वास्तुशास्त्र, स्थापत्यशास्त्र असत हे दाखवून दिले.

वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना असलेली अनेक मंदिर आपल्याकडे आहेत. उपेक्षित असली तरी यांच्यासारखे काम पुन्हा होऊ शकणार नाही. हे सांगणारी ही मंदिर म्हणूनच आवर्जुन पहायला हवीत एखाद्या वास्तूवर प्रेम आणि भक्ती का

करावी या प्रश्नाचे उत्तर नाशिकमधील सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर पाहिल्यावर मिळते.

**गोंदेश्वर मंदिर :**

गोंदेश्वर मंदिर सिन्नर, जि. नाशिक येथे आहे. या मंदिराचे वैशिष्ट्ये म्हणजे हे पंचायतन (पाच मंदिरांचे मिळून) प्रकारातले आहे. एकाच ओट्यावर मध्यभागी मुख्य मंदिर असून, ओट्याच्या चार कोपऱ्यांवर चार छोटी मंदिरे असली म्हणजे त्याला पंचायतन म्हटले जाते. येथे मुख्य देऊळ शिवाचे व कोपऱ्यातील मंदिर विष्णू, सूर्य, गणेश व देवी यांची आहेत. शैव, वैष्णव, सूर्योपासक गणेशभक्त व शाक्त यांनी एकत्र यावे म्हणून आद्यशंकराचार्यांची पंचायतनाचा पुरस्कार केला असे मानतात. उत्तम अवस्थेत असलेले महाराष्ट्रातील हे एकमेव पंचायतन मंदिर आहे.[१]

यातील शिवमंदिराला नंदी मंडप स्वतंत्र आहे. या मंदिराच्या गर्भग्रहावर भूमिज शिखर आहे. चार आयतनांवर नागरशिखरे आहेत. नंदी मंडपावर द्रविड शिखर आहे.[२] मंदिराची कलाकृती मानाचे स्थान मिळवणारं एक अद्वितीय लेणं काहीस अपरिचित मंदिराच्या निर्मितीबाबत अनेक ठिकाणी केवळ अंदाजच व्यक्त केलेले दिसतात. मंदिर हे साधारण बाराव्या शतकात यादव राजा गोविंद याने बांधले असे सांगतात. याच राजाच्या नावावरून मंदिराचे नाव अपभ्रंशाने गोविंदेश्वर आणि त्यावरून गोंदेश्वर पडल्याची कथाही ऐकवली जाते. हेमाडपंथी पध्दतीचे हे मंदिर आहेत. त्याची रचना रामदेवराय यादवाचा प्रधान हेमाडपंत याने ही पध्दत रचली दगडावर दगड ठेऊन ही रचना चुनामाती न वापरता केली जात होती.[३] हे मंदिर म्हणजे पाच मंदिरांचा समूह आहे. मुख्य शिवाचे मंदिर मध्यभागी तर चार दिशांना चार काही छोटे मंदिर आहेत. गणेश, पार्वती, विष्णू आणि सुर्यदेव असे हे पाच शिवपंचायतन म्हणूनच याला शैवपंचायतन असेही म्हटले जाते. या पाचही मंदिराभोवती तटबंधी असून छान प्रवेशद्वारही आहे. प्रवेशद्वारातून आत गेलो की, मोकळ्या पटांगणातच हे शिल्पलावण्य खुलताना दिसते. साधाणत: पाच फुट उंचीच्या एका छोट्या दगडी चौथऱ्यावर ही वास्तू उभी आहे. हा दगडी चौथरा एकसंघ असून तो तिथ कसा बसवला वा आणला असेल याचे कोडे पडल्याशिवाय राहत नाही. चौथऱ्यावर जाण्यासाठी पायऱ्या चढून गोंदेश्वराच्या पूर्वाभिमुख शिवमंदिरासमोर जायचं. याची रचना नंदीमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गाभारा अशी आहे. नंदीमंडपातून आपण थेट सभामंडपात येतो. यात एकूण सोळा खांब असून चार मधोमध उभे आहेत. हे सगळे खांब सौंदर्याने ओतप्रोत भरलेले वाटतात. यांच्यावरील कलाकुसर, नक्षी, नजाकत ही डोळ्यांऐवजी हाताने अनुभवावी अशीच आहे. वरचे छत सुध्दा असंच रेखिव घडवलेले आहे. या मंडपात तीन दिशांना तीन दरवाजे आहेत. हे लावण्य डोळ्यांत साठवूनच आपण अंतराळात प्रवेश करतो. हा कक्ष अतिशय छोटा असून शेजारी गाभारा आहे. धीरगंभिर अशा गाभाऱ्यात पाऊल टाकताक्षणी आपल्याला जाणवतो तो इंथला गारवा.[४]

हे मंदिर पूर्वाभिमूख आहे. भूमिजशैलीचे सर्वात सुंदर मंदिर आहे. अधिष्ठानावर गजथर उंच आणि बाहेर आलेला आहे. रत्नांचे निदर्शक चौकट, पद्म, फणी, वर पुन्हा पद्म असे थर करून त्यावर हत्ती म्हणजेच गजथर दाखवले आहेत. जंघा भागावरील तीनही देवकोष्ठ आज रिकामे आहेत उभ्या कोनाकोनांनी बनलेल्या भिंती सुरेख, सुबक या कोरीव कामाने नटलेल्या आहेत. मूर्तीची लक्षणीय रेलचेल नसली तरी सुरसुंदरीच्या प्रतिमा तीनही अर्धमंडपात बाहेरच्या भिंतीवर दिसतात.

मंडपाचे छत संवरण प्रकारचे आहे. पिरॅमिडसारखे निमुळते होत जाणारे टोकदार शिखर घडवताना कोरीव नक्षीकामाच्या पायऱ्यांची रचना केलेली असते. म्हणजे शिखर साधे सपट निटसं दिसत नाही. मंदिराचे इतर कोरीव कामाशी

लय जुळवत स्वत:चे वेगळेपण जपणारे संवरण शिखर मुख्य शिखरापेक्षा बुटके, बसके असते. त्यामुळे अंतराळावरचे शुकनास किंवा अर्धगोलाकार शिखर आणि गाभाऱ्यावरचे उभे उंच शिखर या दोघांच्या सौदर्यात भरच पडते.[५]

मोठ्या प्रसन्न मनानं आतलं हे भक्तीचं वातावरण जाणून घ्यावं असं वाटतं. शिवपिंडाचे दर्शन घेऊन आपण बाहेर पडलो की मंदिराची बाह्यरचना आपल्याला खुणावते. उत्कृष्ट हेमाडपंथी रचना असलेले बाह्यांग मोहविणारे आहे. मुख्य शिखर त्यावरील भूमिज पध्दतीची मांडणी ही पहातच राहविशी वाटते. बाह्य शिल्पामध्ये रामायण, महाभारताचे प्रसंग, अप्सरा, हत्ती आदींच्या कलाकृती थक्क करणाऱ्या आहेत. मंदिर प्रदक्षिणेदरम्यान आपल्याला चार दिशेला चार मंदिर दिसतात. नंदीमंडप एखाद्या मंदिरासारखा पण खुला आहे. वर शंकुसारखे शिखर आहे. पश्चिमाभिमुख नंदीमंडप आहे. गोंदेश्वर मंदिराच्या मंडपातील स्तंभही अंबरनाथच्या मंदिरातील साम्य दाखवतात. रचना, तट, दोन चौकट टोके जोडून ठेवतात तसा आहेच. शिवाय स्तंभांमध्येही सारखेपणा दिसतो. वरच्या हस्तांवर आकर्षक स्त्रीप्रतिमा कोरल्या आहेत. स्तंभ हे सोळंकी पध्दतीचे असले तरी स्वत:चे वेगळेपणा जपणारे सुंदर स्तंभ इथे आहेत.[६] गोंदेश्वर मंदिर अतिप्राचीन आणि मंत्रमुग्ध करणारे मंदिर पाहून धन्य वाटतं. मंदिर हे केवळ मुर्तीच्याच दर्शनासाठी नसून ते मन:शांतीसाठी व कलेचा प्रसार करण्यासाठी होते. प्राचीन मंदिर संकल्पना बैठक धर्म ही असली तरी सामाजिक जीवनाचा या मंदिरांशी घनिष्ठ संबंध आला आहे. सभामंडपात नृत्य गायन हे परमेश्वराचे उपासनचे साधन मानल्यामुळे निषीध्द नव्हते व त्यामुळे या कलांचा विकास होण्यासाठी महत्वाचे ठरते. याच सभामंडपात गावांच्या प्रश्नांची चर्चा होत असे. भजने, कीर्तन यासाठी लोक एकत्रित येत. तेव्हा देवळे ही धार्मिक, सामाजिक व कलासंस्कृती यांच्या हालचालीची केंद्रे बनली हे महत्वाचे आहे.

**निष्कर्ष :**

१) सामाजिक जीवनाचा मंदिरांशी घनिष्ठ संबंध आला आहे.

२) गोंदेश्वर मंदिर हे वास्तुशास्त्र व स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना दिसतो.

**सारांश :**

मंदिर म्हणजे सामाजिक संस्था असे त्यांचे स्वरूप अजुनही खेड्यापाड्यात टिकून आहेत. पूर्णपणे विकसित मंदिर स्थापत्य अनेक गोष्टींचा समावेश झाल्यामुळे त्यात भारतीय जीवनाचे घटक व सामाजिक संस्था म्हणून त्यात झालेल्या विकासाची वा फेरफाराची प्रतिबिंब दिसून येतात. मंदिर स्थापत्य केवळ भौतिक प्रगती दाखविणारे असे नसून ते त्या सामाजाची सांस्कृतीकस्थिती दाखवित असते. मंदिरे आणि जीवन यांचे प्राचीन व मध्ययुगीनकाळी अतूट नाते होते. लहानपण मंदिरात जाऊन पाठ घेण्यात, सभा घेण्यात जायचे वा तेथिल पाठशाळेत राहूनच शिकण्यात जमायाचे मंदिरात न्याय निवाडे केले जात. तेथेच कथा-कीर्तनातून पोथी-पुराणातून व्यवहाराचे, नीतिमत्तेचे मन:शांतीचे, सदाचाराचे, संयमाचे व समाधानाचे धडे दिले जात. गायन, नर्तन हे मंडपातील रंगाशिलेवर केले जाई आपसुकच दोन-तीन गोष्टी यातून साध्य होत. एक हे माझे नाही 'इदम न मम' ही वृत्ती दोन कला जीवनासाठी समर्पणासाठी असते. ही जाणीव व तीन कलांची शिक्षण मिळत होते.

मंदिराच्या बाहेर किंवा भोवती खेड्यापाड्यातून आठवडी बाजार भरे, यात्रा भरत असत. वस्तुंच्या विनिमयावरची विचारांची देवाण- घेवाण होई. पंचक्रोशित घडणाऱ्या घटना कळत. मंदिराची स्थापना मुख्यत: देवांसाठी त्याचबरोबर

निर्माण झाली असली तरी ती आपल्या जीवनाशी फार निगडीत असते. पाथरवट, गवंडी, सुतार, धार्मिक गोष्टी जाणणारे. शिक्षक, कलाकार व पंच या सगळ्यांचे योगदान त्यासाठी आवश्यक असते. म्हणून म्हणायचे की मंदिर एक सामाजिक संस्था आहे.

**संदर्भ सूची :**


१) देगलूरकर गो.बं., लोकराज्य, नोंव्हेंबर- २०११, पृ.क्र. २५

२) प्रा. रायरीकर कल्पना, केंजळे सौमित्र, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हें-२००८, पृ.क्र. १३३

३) सगणे शांताराम, आपला महाराष्ट्र परंपरा व प्रगती, सुधारित आवृत्ती, ०१ नोव्हेंबर- १९८५, पृ.क्र. ६९

४) वर्तले ओंकार, औरंगाबाद टाईम्स, २० फेब्रुवारी -२०१५, पृ.क्र. ३

५) डॉ. काळे भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हें.- २००९, पृ.क्र. ४२

६) कित्ता, पृ.क्र. ४३